“हैदराबाद संस्थानात मराठवाड्यातील जहागीरदारांचे निजामाच्या अर्थव्यवस्थेतील योगदान- एक ऐतिहासिक अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)

या पदवीकरिता सादर केला जाणारा संशोधन आराखडा

संशोधक

चंद्रकांत दत्तात्रय तोगरे

मार्गदर्शक

प्रा.डॉ.सूर्यकांत दिगंबर सावंत

इतिहास विभागप्रमुख

शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

संशोधन केंद्र

नूतन महाविद्यालय, सेलू

मार्च - २०२२

“हैदराबाद संस्थानात मराठवाड्यातील जहागीरदारांचे निजामाच्या अर्थव्यवस्थेतील योगदान - एक ऐतिहासिक अभ्यास”

प्रस्तावना

स्वातंत्र्यापूर्वी संपूर्ण भारतात ५३६ संस्थाने होती. या संस्थानाचा राज्यकारभार देशी राजे-संस्थानिक करत होते. दक्षिण भारतात नागपूर, कोल्हापूर, बडोदा, त्रावणकोर, हैदराबाद ही देशी राज्ये व संस्थानिक होते. मोगलांच्या दक्षिणेतील सुभेदार मीर कमरुद्दीन निजाम-उल-मुल्क याने ३१ जुले १७२४ ला भागानगरला हैदराबाद संस्थानाची निर्मिती केली. त्याचे घराणे आसफीया घराणे म्हणून ओळखले जात होते. इ.स.१७२४ ते १९४८ पर्यंत जवळ-जवळ सव्वादोनशे वर्षे या घराण्यांनी राज्य केले. निजामाच्या संस्थानात मराठवाडा तेलंगणा आणि कर्नाटक अशा बहुभाषिक प्रांताचा समावेश होता. या साम्राज्याचे क्षेत्रफळ ८२६१८ चौरस मैल होते.

निजामाने आपले साम्राज्य अबाधित ठेवण्यासाठी वेगवेगळ्या जहागिऱ्या दिल्या. निजाम हा स्वतः एक जहागीरदार होता. त्यांनी आपल्या संस्थापनात पायगा-सर्फखास जहागीर आणि संस्थान असे जहागिरीचे प्रकार केले होते. या जहागिरीच्या माध्यमातून त्यांनी संस्थानावर सर्व प्रकारची पकड मजबूत करण्यासाठी मोठ्या प्रमाणात जहागिरी दिल्या. त्यामुळे त्यांना मोठ्या प्रमाणात महसूल प्राप्त होत होता. त्यांनी तो महसूल हैदराबाद शहराच्या विकासासाठी वापरला. मराठवाड्यात निजामाची सर्फखास ही खास स्वतःची जहागिरी होती. त्यात ७१३ खेडी आणि सात तालुक्यांचा समावेश होता. या सर्फखास मधून निजामाला वर्षाकाठी एक लाख रुपये मिळत होते. तो स्वतःच्या खर्चासाठी हे उत्पन्न वापरत होता. निजामाने आपल्या परगण्याची व्यवस्था पाहण्यासाठी

देशमुख, पटवारी, चौगुला, मामलेदार यांची नियुक्ती केली होती. ठरवलेल्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून जहागिरीमध्ये वर्चस्व निर्माण केले होते.

निजामाने सध्याच्या मराठवाड्यात तत्कालीन जिल्ह्यामध्ये मोघलांनी रूढ केलेली महसूल पद्धत रूढ केली होती. निजामाच्या काळात जाणीवपूर्वक महसुलात बदल करून लिलाव पद्धतीने 'गुत्तेदार' नेमले. महसूल वसुल करणाऱ्यांना तालुकदार असेही म्हणत होते. पाटील-पटवारी यांच्यामार्फत महसूल गोळा केला जात होता. मराठवाड्यात शेती हाच मुख्य व्यवसाय होता. त्यातून किती प्रमाणात महसूल गोळा करावा यावर कसलेच बंधन नव्हते. जो कोणी सरकारला जास्त महसूल गोळा करून देईल त्याला 'इजारा' पद्धतीने जास्तीची जमीन मिळत होती. संस्थानात दिवाणी किंवा खालसा जमीन आणि निजामाची सर्फ-ई-खस व इतर जहागिरी असे जमीन महसुलाच्या पद्धतीचे दोन प्रकार होते. सर-सालारजंग या दिवाणाने त्याच्या काळात जमीन महसुलात आमुलाग्र बदल केले. त्यात रयतवादी पद्धती, मराठवाड्यात शिकमीदार व इतर जमीन धारणा पद्धतीमध्ये जहागीर-इनाम, पनतक्ता (मयता), ताहूद-सरबस्त, पेशकश, 'अग्रहार' आणि 'इजारा' यांचा समावेश होता म्हणजे निजामाची आर्थिक ताकद ही त्यांनी महुसलात केलेला बदल व जहागीदार यांच्यामुळे त्यांची आर्थिक व्यवस्था बळकट झालेली होती. म्हणून निजामाचे नेमलेले जहागीरदार मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात अन्याय अत्याचार करत होते. रोहिले पठाणाची अरेरावी, आर्थिक पिळवणूक व त्यातून निजामाची राजवट उलथून टाकण्यासाठी जनतेने लढा उभारला व शेवटी १९४८ ला संघर्षाचा शेवट झाला आणि निजामाची सत्ता संपुष्टात आली.

संशोधन विषयाची निवड

मध्ययुगातील निजामाच्या काळात संस्थानातील बहुसंख्य प्रजा हिंदू व राज्यकर्ते मुस्लिम होते. हिंदूंची पिळवणूक सर्व स्तरातून होत होती. हैदराबाद संस्थानातील अर्थव्यवस्थेत मराठवाड्यातील जहागिरीदारांचे योगदानही उल्लेखनीय आहे. मात्र याचा

फारसा अभ्यास झालेला दिसून येत नाही. तत्कालीन काळातील हैदराबाद संस्थानात असणाऱ्या मराठवाड्यातील जहागीरदारांचे महसूल वसुलीचे धोरण, कार्यपद्धती आणि आर्थिक हितसंबंधाचा निजामाच्या अर्थव्यवस्थेवर काय परिणाम झाला हे अभ्यासणे महत्त्वाचे वाटले.

संशोधन विषयाचे महत्त्व

निजामाची राजवट ही अत्यंत जुलमी राजवट होती. यामुळेच हैदराबाद मुक्तिसंग्रामाचा अभूतपूर्व लढा संस्थानात उभा राहिला. तत्कालीन निजामांच्या श्रीमंतीचे अनेक दाखलेही दिले जातात. त्यात हैदराबाद संस्थानाच्या अर्थव्यवस्थेला जहागीरदारांनी महसूल वसूल करून दिल्याने बळकटी दिल्याचे दिसून येते. तत्कालीन राजवटीतील अर्थव्यवस्थेतील महसूल हा आर्थिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा घटक असून या दुर्लक्षित विषयावर ऐतिहासिकदृष्ट्या कालसुसंगत अभ्यास करणे आणि वर्तमान जीवनातील प्रस्तुत विषयाची मूल्यात्मकता अभ्यासण्यासाठी प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने काही उद्दिष्टांची मांडणी पुढीलप्रमाणे करण्यात आलेली आहे.

१) निजामकालीन मराठवाड्यातील जहागीरदारांचा अभ्यास करणे.

२) निजामाच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास करणे.

३) मराठवाड्यातील जहागीरदारांची कर आकारणी, तिचे स्वरूप, व्याप्ती व पद्धतीचा अभ्यास करणे.

४) जहागीरदारांचा निजामाच्या अर्थव्यवस्थेवर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.

५) निजामाने मराठवाड्यात केलेल्या सुधारणांचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहितके

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितके निश्चित करण्यात आलेली आहेत.

१) हैदराबाद संस्थानातील सर्व निजाम शासक हे प्रजेवर अन्याय अत्याचार करत होते.

२) मराठवाड्यातील जहागिरीत जहागीरदारांचे प्राबल्य होते. तत्कालीन जहागीरदार व वतनदार जनतेला त्रास देत असत.

३) मराठवाड्यातील जहागीरदारांचे जहागीर परगण्यातील महसूल पद्धती अन्यायी व जुलमी होती.

४) मराठवाड्यातील जहागीरदारांनी मराठवाड्यात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक विकास केल्याचे दिसून येत नाही.

५) मराठवाड्यातील जहागीरदारांकडून निजामाला मिळणारे आर्थिक उत्पन्न जास्त होते. या महसूलातून संस्थानाचा आर्थिक विकास झालेला दिसून येतो.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधन हे प्राथमिक व द्वितीय साधन सामुग्रीवर आधारित असणार आहे. यात जुन्या तथ्यांचे परीक्षण आणि चिकित्सा करण्यात येणार असून विश्लेषणात्मक पद्धतीने संशोधनाची मांडणी करण्यात येणार आहे. प्राथमिक स्त्रोतांमध्ये ऐतिहासिक संदर्भ पद्धती, सर्वेक्षण पद्धती, मुलाखत पद्धती वापर करून माहिती संकलित करण्यात येणार आहे. तसेच द्वितीय सामुग्रीमध्ये विविध संदर्भ ग्रंथ, प्रकाशित अप्रकाशित अहवाल, गॅझेटिअर, जनगणना अहवाल, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, इंटरनेटवरील माहिती यांच्या आधारे माहितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

संशोधनाची व्याप्ती

हैदराबाद संस्थानात जवळपास ७ निजाम होऊन गेले आहेत. त्यांची कार्यपद्धती वेगवेगळी राहिलेली आहे. मात्र निजामकालीन मराठवाड्यातील जहागीरदारांचा अभ्यास ही संशोधनाची व्याप्ती सांगता येईल.

संशोधनाची मर्यादा

हैदराबाद संस्थानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यास असताना फक्त मराठवाड्यातील जहागीरदारांचे अर्थव्यवस्थेतील योगदान अभ्यासणे ही या संशोधनाची मर्यादा सांगता येईल.

पूर्वलिखीत साहित्याचा आढावा

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अनेक बाजूंवर लिखाण झालेले असून ते उपलब्ध आहे. त्याचा आढावा खालीलप्रमाणे घेता येईल.

१) काटे पी.व्ही. यांनी 'मराठवाड्याचा इतिहास' या ग्रंथात हैदराबाद संस्थानाविषयी सविस्तर माहिती दिलेली आहे.

२) काटे पी.व्ही. यांच्या 'मराठवाडा अंडर निजाम' या ग्रंथात हैद्राबाद संस्थान, सर्फखास, जहागीरदार, पायजा, जहागीर संस्थान, कृषी सिंचन याविषयी माहिती मिळते.

३) सरदेसाई गो.स. यांच्या 'ब्रिटिश रियासत खंड दोन' या ग्रंथात निजामकालीन जमीन महसूल पद्धतीत झालेल्या बदलांची माहिती मिळते.

४) कंटे भ.ग. यांच्या 'गुलशने इब्राहिमी' या ग्रंथात दक्षिणेकडील जहागीरदार व वतनदार पाच शाह्यांविषयी माहिती मिळते.

५) कठारे अनिल यांच्या 'हैदराबाद राज्याचा इतिहास' या ग्रंथात हैदराबाद संस्थान, सर्व निजाम, तत्कालीन राजकीय सामाजिक माहिती मिळते.

६) भालेराव अनंत यांच्या ‘स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा’ या ग्रंथात हैदराबादच्या निजामाने केलेले अन्याय अत्याचार व निजामाच्या विरोधातील लढा याविषयी महिती मिळते.

७) गायकवाड व इतर यांच्या ‘मराठेकालीन संस्था व विचार’ या ग्रंथात पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपाडे, चौगूला यांचे ग्रामसंस्थेतील योगदानाची माहिती मिळते.

८) रेड्डी रामकृष्ण यांच्या ‘हैदराबादचा आर्थिक इतिहास’ या ग्रंथात हैदराबाद राज्यातील आर्थिक स्थिती, पीक पद्धती महसूल, सिंचन याविषयी माहिती मिळते.

याशिवाय अनेक संशोधकांनी हैदराबाद संस्थानावर ग्रंथ आणि शोधप्रबंधाचे लेखन केले आहे. याशिवाय प्रस्तुत विषयसंदर्भातील शासकीय कागदपत्रेही उपलब्ध आहेत ज्यांचा उपयोग प्रस्तुत संशोधनाकरिता होणार आहे.

प्रकरण मांडणी

प्रस्तुत शोधप्रबंधाची एकूण ०६ प्रकरणांमध्ये मांडणी करण्यात आलेली असून ती खालीलप्रमाणे आहे.

प्रकरण पहिले- हैदराबाद संस्थानाची पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणात तत्कालीन हैदराबाद संस्थानाची स्थापना, भौगोलिक रचना, संस्थानाची राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक स्थिती यांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे - हैदराबाद संस्थानातील जहागीरदार

प्रस्तुत प्रकरणात हैदराबाद संस्थानातील निजामकालीन जहागीरदार, जहागिरीची पद्धत, मराठवाड्यातील जहागीरदारांच्या अंतर्गत व्यवस्था व त्यांचा पराक्रमाचा इतिहास याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे-हैदराबाद संस्थानातील मराठवाड्यातील परगन्याची अंतर्गत रचना

जहागीरीची व्यवस्था, पायगा, जहागीर, सुभे व जहागिरी विभागाची रचना, औरंगाबाद विभाग, मराठवाडा विभाग, हैदराबाद संस्थान, गुलबर्गा विभाग या संदर्भात प्रस्तुत प्रकरणात आढावा घेऊन मांडणी करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे - हैदराबाद संस्थानाचे कृषी व महसूलविषयक धोरण

प्रस्तुत प्रकरणात हैदराबादच्या निजाम काळातील कृषीविषयक धोरण, त्यांचे महसूल विषयक धोरण, महसूल प्रशासन, रचना, त्याचबरोबर निजामाच्या आर्थिक उत्पन्नाचे विविध घटक, त्यातून संस्थानाचा होणारा खर्च याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे- निजामाच्या अर्थव्यवस्थेत जहागीरदारांचे योगदान

प्रस्तुत प्रकरणात निजामाची अर्थव्यवस्था, जमीन महसूल, मराठवाड्यातील जमीन महसूल, जहागीरदारांचे आर्थिक नियोजन, जहागीरदारांचे मराठवाड्यातील उत्पन्न, निजामाला वसूल करून देण्याचा भाग, जहागीरदारांचे संरक्षण हक्क,अधिकार, जहागीरदारांचे मराठवाड्यातील सामाजिक, आर्थिक शोषण त्याचबरोबर त्यांनी केलेले विधायक कार्य व संस्थानाला झालेला आर्थिक लाभ यांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे - निष्कर्ष

शोधप्रबंधाच्या शेवटच्या प्रकरणात संपूर्ण अभ्यासांती हाती आलेले निष्कर्ष मांडण्यात येतील. शेवटी संदर्भ ग्रंथ सूची व परिशिष्ट्ये जोडण्यात येतील.

संदर्भ

१) अत्रे त्रिं.ना, गावगाडा, वरदा बुक्स पुणे, आवृत्ती तृतीय १९८९

२) कठारे अनिल, हैदराबाद राज्याचा इतिहास, कल्पना प्रकाशन, नांदेड, २००५

३) काटे पी.व्ही., मराठवाड्याचा इतिहास, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, १९९९

४) काळे भगवान, मराठवाडा काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना, १९८६
५) कुंटे भ.ग. (अनु.) गुलशने इब्राहिमी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७८
६) गर्गे स.मा., संघर्ष, आ.कृ. वाघमारे स्मृती समिती, औरंगाबाद, १९८१
७) चपळगावकर नरेंद्र, कर्मयोगी संन्यासी, मौज प्रकाशनगृह, मुंबई, १९९९
८) जोशी द.पं. (संपा.), समग्र सेतू माधवराव पगडी, खंड २, मराठी साहित्य परिषद आंध्रप्रदेश, इसामिया बाजार, हैद्राबाद, २०१०
९) पोतदार वसंत, हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम, विद्याभारती प्रकाशन, लातूर, आवृत्ती तृतीय २००६
१०) भालेराव अनंत, हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन गृह, मुंबई, २००१
११) भालेराव अनंत, हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९८७
१२) भालेराव-धारूरकर-शुभदा, हैद्राबाद मुक्तिसंग्राम महिलांचा सहभाग, समर्थ नगर, औरंगाबाद, २००१
१३) रोडे सोमनाथ, हैद्राबाद मुक्ती लढा आणि स्वामी रामानंद तीर्थ, आश्विनी प्रकाशन, लातूर, २००८
१४) स्वामी रामानंद तीर्थ, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी (अनु.देऊळगावकर वि.पा.), पॉल्युलर प्रकाशन, मुंबई, १९७६
१५) सिद्यीकी एन.ए., मोगलकालीन महसूल पद्धती, डायमंड पब्लिकेशन, पुणे, २००६

इंग्रजी

1) The Quarterly Review of Historical Studies, Editor-N.R. Ray, Institute of Historical Studies Calcutta Volume XX, 1940-81
2) Regani Sarojini, Nizams British Relations 1724-1857, Concept Publishing Company, New Delhi-110059

3) Dr.Ramesan N. (Edi.), Journal of the Andhra Pradesh State, Archieve (India), Itihas, July to December 1979, Vol.VII, Director General of Archieve Government of Andhra Pradesh, Hyderabad-500007 (India, 1979
4) Vaikuntham Y., Studies in Socio-economic and Political History, Hyderabad State, 2004
5) Reddy, Ramkrishna V., Economic History of Hyderabad State, Gian Publishers, 1987

गॅझेटिअर

१) पाठक अरुणचंद्र (संपा.), औरंगाबाद जिल्हा गॅझेटिअर, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००६
२) पाठक अरुणचंद्र (संपा.), नांदेड जिल्हा गॅझेटिअर (भाग २), दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, २००६
३) कुंठे बी.जी. (संपा.), उस्मानाबाद जिल्हा गॅझेटिअर, मुंबई, १९७२
४) Imperial Gazetteer of India, Provincial Series, Hyderabad State, Suprintendent of Government Printing, Calcutta, 1991

संशोधक ***मार्गदर्शक***

चंद्रकांत दत्तात्रय तोगरे

प्रा.डॉ.सूर्यकांत दिगंबर सावंत
इतिहास विभागप्रमुख
शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर